दै. तरुण भारत दि. २१।०१।२५.

# रेझिंग डे निमित्त सपोनि जाधवर यांचे विध्यार्थ्यांना कायदे विषयक मार्गदर्शन!



**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. १९ जानेवारी**

पोलीस स्थापना दिवसाच्या अनुषंगाने पोलीस दलातर्फे दरवर्षी २ जानेवारी ते ८ जानेवारी पोलीस रेझींग डे सप्ताह साजरा करण्यात येतो.

शाळा, कॉलेजमध्ये पोलिसांच्या वतीने या सप्ताहात विद्यार्थ्यांना गुन्हे विषयक जनजागृती, वाहतूक नियमन, सायबर क्राईम जनजागृत, महिला व बालक यांच्या वरील गुन्हे विषयक जनजागृती, कायदेविषयक आणि संरक्षणाविषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा मानस असतो. त्याच अनुषंगाने माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलिस स्टेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले महाविद्यालय, अंजनखेड येथे सपोनि. आर.बी.

जाधवर यांनी दि.१६ जानेवारी रोजी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी वाईट प्रवृत्ती पासून दूर राहावे, माता पित्यांचा व वडिलधाऱ्यांचा मान सन्मान करावा, तरुण पिढीने व्यसनाधीनतेपासून दूर रहावे, तसेच मुलींनी आपले संरक्षण स्वतः करावे! असा मोलाचा सल्ला दिला.

स.पो.नि. आर. बी.जाधवर यांनी यावेळी रेझिंग डेविषयी माहिती देतांना पुढे सांगितले कि, डायल ११२ तसेच बालकांचे लैगिक छळसंबंधी कृत्यांबाबत व कायदेशीर उपाययोजनांबाबत मुला -मुलींना समजेल अशा पद्धतीने माहिती दिली. तसेच नायलॉन मांजाचे दुष्परिणाम याबत माहिती देऊन ते न वापरण्याबाबत प्रोत्साहित केले. या वेळी पोउनि. आर.एम. गिरी, शाळेच्या मुख्याध्यापिका जयस्वाल मॅडम, प्रा. जय खराटे, प्रा. विनोद कांबळे, प्रा. प्रवीण बिराजदार आदींसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.